admn 25-26

MCAER
कृषि परिषद

# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

ई मेल- mcaer@rediffmail.com  दूरध्वनी क्र.- ०२०-२५५२८६८८

संकेतस्थळ- www.mcaer.org

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

जा.क्र. मकृप/शिक्षण-१/३१२५/ ५८८ /२७८६    दि. ०२ डिसेंबर,२०२५

## परिपत्रक

**विषयः-  पदव्युत्तर प्रवेश प्रक्रिया २०२५-२६**
**रिक्त जागा भरण्यासाठी कृषी विद्यापीठाच्या मुख्यालयी दि. ८ आणि ९ डिसेंबर,२०२५ रोजी 'जागेवरील प्रवेश फेरी' राबविणेबाबत.**

सन २०२५-२६ हया शैक्षणिक वर्षातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया दि. १८/९/२०२५ ते दि. ४/११/२०२५ हया कालावधीत कृषी परिषदेकडून राबविण्यात आली. भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली (भाकृअप) यांच्याकडील प्रवेश प्रक्रिया दि.२० नोव्हेंबर,२०२५ पर्यंत राबविण्यात आलेली आहे. कृषी परिषदेच्या दि.२६/१२/२०२३ रोजीच्या ११३ व्या बैठकीमध्ये रिक्त जागा भरण्याविषयी सूचित करण्यात आलेले आहे. करिता चारही कृषी विद्यापीठांतर्गत सध्या रिक्त असलेल्या जागांचाही तपशील प्राप्त करून घेण्यात आलेला आहे.

कृषी व पदुम विभाग, शासन निर्णय क्र.कोकृवि-११२५/प्र.क्र.१६६/ई-१३९३६७४/७-अे, दि.४/११/२०२५ अन्वये डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली अंतर्गत सह्याद्री शिक्षण संस्था, सावर्डे संचलित शरदचंद्रजी पवार कृषि महाविद्यालय, खरवते-दहिवली, ता.चिपळूण जि.रत्नागिरी येथे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून कृषी विद्याशाखेंतर्गत तीन विषय आणि उद्यानविद्या शाखेंतर्गत दोन विषयांमध्ये प्रत्येकी २ विद्यार्थी प्रतीवर्ष या प्रवेश क्षमतेने पदव्युत्तर (कृषी) अभ्यासक्रम सुरु करण्यास विहित अटींच्या अधीन राहून मान्यता दिलेली आहे.

यास अनुसरून सन २०२५-२६ हया शैक्षणिक वर्षातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अंतिम गुणवत्ता यादीतील सर्व उमेदवारांना या परिपत्रकाद्वारे अवगत करण्यात येते की, **दि. ८ आणि ९ डिसेंबर,२०२५ रोजी राज्यातील चारही कृषी विद्यापीठांच्या मुख्यालयी 'जागेवरील प्रवेश फेरी' राबविण्यात येणार आहे.** सदर प्रवेश फेरीद्वारे कृषी परिषदस्तरावर यापूर्वी राबविण्यात आलेल्या प्रवेश प्रक्रियेंतर्गत रिक्त जागा आणि भाकृअपच्या कोटयातील रिक्त जागा तसेच शरदचंद्रजी पवार कृषि महाविद्यालय, खरवते-दहिवली, ता.चिपळूण जि.रत्नागिरी येथील जागा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. जागेवरील प्रवेश

फेरीद्वारे भरावयाच्या जागांचा तपशील **https://pg.agrimcaer.in** हया संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

सन २०२५-२६ हया शैक्षणिक वर्षाच्या अंतिम गुणवत्ता यादीत समाविष्ट असलेले आणि चालू शैक्षणिक वर्षाच्या पदव्युत्तर प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेशित नसलेले (not admitted) उमेदवार 'जागेवरील प्रवेश फेरी'करिता पात्र असतील. तसेच राज्यातील कृषी विद्यापीठांतर्गत सध्या प्रवेशित उमेदवारास जागेवरील प्रवेश फेरीमध्ये प्रविष्ठ व्हावयाचे असल्यास अशा विद्यार्थ्यांनी त्यांचा सध्याचा प्रवेश रद्द केल्यास त्यांना जागेवरील प्रवेश फेरीमध्ये प्रविष्ठ होता येईल. अशा पात्र उमेदवारांनी तसेच चारही कृषी विद्यापीठांतील प्रवेश प्रक्रियेशी संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांनी पुढील बाबी विचारात घ्याव्यात.

(१) उमेदवाराने रिक्त जागांचा तपशील विचारात घ्यावा आणि ज्या कृषी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालयात प्रवेश घेण्यास इच्छुक आहे, अशा कृषी विद्यापीठाच्या मुख्यालयी उमेदवाराने सकाळी ९.३० ते ११.०० या कालावधीत आवश्यक ती सर्व मूळ कागदपत्रे व शुल्कासह उपस्थित राहावे.

(२) कृषी विद्यापीठाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी सकाळी ९.३० ते ११.०० या वेळेत उपस्थित असलेल्या उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करावी आणि सूचना फलकावर प्रसिध्द करावी.

(३) प्रथमतः बिंदुनामावलीतील बिंदुचा क्रम व त्यानुसार उपलब्ध जागा विचारात घेऊन संबंधित प्रवर्गातील गुणवत्तेप्रमाणे प्रवेश देण्यात यावेत. यानंतर बिंदुचा क्रम नसलेल्या रूपांतरीत (CR,CO) जागांवर गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात यावेत.

(४) संबंधित आरक्षित प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध नसल्यास, शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र.मकृवि-२०१०/प्र.क्र.१५५/७अे, दि.२०/१०/२०११ मधील परिशिष्ट २ येथील रूपांतराच्या कार्यपध्दतीनुसार अशा रिक्त जागांवर शेवटच्या दिवशी म्हणजेच **दि. ०९/१२/२०२५ रोजी** उपस्थित असलेल्या इतर उमेदवारांना गुणानुक्रमाने प्रवेश देण्यात यावेत.

(५) योग्य त्या उमेदवाराची प्रवेशासाठी निवड निश्चित झाल्यास त्याप्रमाणे **https://pg.agrimcaer.in** हया संकेतस्थळावर नोंदणी करून 'लॉग इन'द्वारे संबंधित उमेदवारास प्रवेश द्यावा. यासाठी संकेतस्थळावरील संबंधित कृषी विद्यापीठाच्या 'लॉग इन'मध्ये योग्य ती सुविधा उपलब्ध असेल.

(६) उमेदवाराची योग्य ती कागदपत्रे व आवश्यक ते शुल्क स्वीकारण्यासाठी प्रत्येक कृषी विद्यापीठाने योग्य ती व्यवस्था करावी.

(७) व्यवस्थापन कोटयामधील रिक्त जागा भरण्याविषयी संबंधित विना अनुदानित महाविद्यालयाने त्यांच्यास्तरावर नियमानुसार प्रक्रिया करावी.

**(८) या प्रवेश फेरीद्वारे प्रवेशित विद्यार्थ्यांना कोणत्याहीप्रकारची शिष्यवृत्ती / शुल्काची प्रतिपूर्ती मिळणार नाही.**

**मा.महासंचालक यांच्या मान्यतेने.**

**(यशवंत साळे)**
**संचालक (शिक्षण)**

प्रत कार्यवाहीसाठीः-

१) कुलसचिव / अधिष्ठाता (कृषी), महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी, जि.अहमदनगर / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी

२) मे. विबास टेक्नोलॉजी, पुणे

यांना सूचित करण्यात येते की, सर्व संबंधितांना अवगत होण्याच्या दृष्टिकोनातून त्यांनी सदरचे परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे.

३) मे. ॲनालिटीका बिझीनेस सोल्युशन्स, पुणे

यांना सूचित करण्यात येते की, उक्त परिपत्रकाबाबत पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अंतिम गुणवत्ता यादीतील सर्व उमेदवारांना, महाविद्यालयांना भ्रमणध्वनी / ई-मेल संदेशाद्वारे अवगत करण्यात यावे. तसेच महाविद्यालयांच्या लॉगइनमध्ये तसेच संकेतस्थळावर आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात.